परिपत्रक क्र.७५

विषय : माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्जदारास सांक्षाकित प्रती देणेबाबत.

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

क्र.झोपुप्रा/प्रशा/मा.अ.अ/२००५/साक्षांकित प्रती/२००६/२४८
दिनांक :१७/०४/२००६.

संदर्भ : १.कार्यालयीन परिपत्रक क्र.३६,एस.आर.ए./एडिएम/वर्क डिस्ट्री/१२९ दि.१४.१.२०००
२.कार्यालयीन परिपत्रक क्र.४१,एस.आर.ए./एडिएम/वर्क डिस्ट्री/ दि.२०.५.२०००
३.कार्यालयीन परिपत्रक क्र.५८,एस.आर.ए./सिटीएसओ/सर्टिफाईड कॉपीज/२००३ दि.१५.१२.२००३.
४.क्र.झोपुप्रा/प्रशा/मा.मा.अ./२००३/१७७ दि.१७.३.२००६

## परिपत्रक

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणा अंतर्गत अर्जदारास साक्षांकित प्रती देणे, नस्तींचे निरीक्षण करणे इत्यादी अधिकार उपोद्यातील कार्यालयीन परिपत्रक क्र.३६ व ४१ अन्वये **''नगर भूमापन अधिकारी''/झो.पु.प्रा.** यांना प्रदान करण्यात आलेले आहे. कार्यालयीन कामाचा आढावा घेतला असता अर्जदारास साक्षांकित प्रती देण्याच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून अर्जदारास साक्षांकित प्रती देणे, नस्तींचे निरीक्षण करणे इत्यादी अधिकार नगर भूमापन अधिकारी,झोपुप्रा या एकाच अधिका-याकडे न ठेवता प्राधिकरणातील अन्य इतर अधिका-यांना त्यांच्याशी संबंधित कामानुसार वाटप करण्याबाबतचा प्रशासकिय निर्णय कार्यालयीन टिपण्णी दि.५/४/२००६ अन्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणा अंतर्गत उपोद्यातील अनु.क्र.४ येथील कार्यालयीन आदेशान्वये घोषित केलेल्या प्राधिकरणातील सर्व **''सहाय्यक शासकिय माहिती अधिकारी''/झोपुप्रा** यांना अर्जदारांच्या मागणीनुसार त्यांच्या कामाच्या संबंधित क्षेत्रातील तसेच विभागा संबंधित माहितीच्या साक्षांकित प्रती देणे, नस्तीचे निरीक्षण करणे इत्यादी कामे पार पाडण्यांचे अधिकार या आदेशान्वये प्रदान करण्यांत येत आहेत.

वरील आदेशास तात्काळ अंमल देण्यांत यावा. सदर परिपत्रक मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,झोपुप्रा यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यांत येत आहे.

सचिव
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

प्रत अग्रेषित :

१. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,झोपुप्रा यांचे स्वीय सहाय्यक
२. मा.विशेष कार्य अधिकारी,धापुप्र यांचे स्वीय सहाय्यक
३. सचिव,झोपुप्रा यांचे स्वीय सहाय्यक
४. वित्त नियंत्रक,झोपुप्रा यांचे स्वीय सहाय्यक
५. उपमुख्य अभियंता,झोपुप्रा
६. सर्व विभाग प्रमुख,झोपुप्रा
७. लेखा शाखा,झोपुप्रा
८. प्रशासन शाखा-निवड नस्ती